जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार त्यांनी नियुक्त केलेल्या गोदाम कर्मचाऱ्यांची अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२४१७/प्र.क्र.४३/ना.पु.१५,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ जानेवारी, २०१८.

संदर्भ :

१) शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-१००३/प्र.क्र.४८३/ना.पु. १४, दि. २६ जून २००३.
२) शासन निर्णय क्रमांक:आस्थाप्र-२४०८/५१९/प्र.क्र.५५७१/ना.पु.१५,दि.१९मार्च,२००८.
३) शासन निर्णय क्रमांक: आस्थाप्र-२४०९/९१/प्र.क्र.२५/ना.पु.१५,दि.१८ मार्च, २००९
४) शासन निर्णय क्रमांक: आस्थाप्र-२४१०/प्र.क्र.३३७/ना.पु.१५,दि.२० एप्रिल, २०१०.
५) शासन निर्णय क्रमांक: आस्थाप्र-२४१०/प्र.क्र.६१९/ना.पु.१५,दि. १८ मार्च, २०११.
६) शासन निर्णय क्रमांक: आस्थाप्र-२४१०/प्र.क्र.६१९/ना.पु.१५,दि. १८ मार्च, २०११.
७) शासन निर्णय क्रमांक: आस्थाप्र-२४११/प्र.क्र.१०५२/ना.पु.१५,दि. ४ एप्रिल, २०१२.
८) शासन निर्णय क्रमांक: आस्थाप्र-२४१३/प्र.क्र.९/ना.पु.१५,दि. १७ एप्रिल, २०१३.
९) शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२४१३/प्र.क्र.२९९/ना.पु.१५,दि. २५ मार्च, २०१४.
१०) शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२४१५/प्र.क्र.८/ना.पु.१५,दि. १७ एप्रिल, २०१५.
११) शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२४१५/प्र.क्र.३६/ना.पु.१५,दि. २० एप्रिल,२०१६.
१२) शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२४१७/प्र.क्र.४३/ना.पु.१५,दि. ९ मे,२०१७.
१३) शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-२४१७/प्र.क्र.४३/ना.पु.१५,दि.१२ ऑक्टोबर,२०१७.

-: **शासन निर्णय** :-

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, जळगांव, सोलापूर, बीड, उस्मानाबाद, लातूर, अकोला, बुलढाणा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली यांना शासन निर्णय क्रमांक ईएसटी-१०७१/१४७०६/एम, दिनांक २९.६.७१, दि.७.८.७१, दि. २५.८.७१ व दि. १४.१२.७१ अन्वये गोदाम कर्मचारी नेमण्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या गोदाम कर्मचाऱ्यांच्या ८४२ अस्थायी पदांना संदर्भ क्रमांक १३ येथील दि.१२ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दि. १ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३० डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. सदर ८४२ गोदाम कर्मचाऱ्यांच्या पदांची आवश्यकता विचारात घेऊन ही पदे पुढे चालू ठेवणे गरजेचे असल्याने, सोबतच्या **विवरणपत्र "अ"** मध्ये दर्शविलेली एकूण ८४२ अस्थायी पदे, सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून रिक्त नाहीत या अटीच्या अधीन राहून, **दिनांक १ जानेवारी, २०१८ ते दि.२८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत** पुढे चालू ठेवण्यास याद्वारे शासन मंजुरी देण्यात येत आहे. कोणतेही नवीन पद यापुढे शासनाच्या पूर्व संमतीशिवाय निर्माण करण्यात येऊ नये. तसेच, **जिल्हाधिकारी यांनी मुदतवाढीच्या पदांची खात्री करुनच पुढील कार्यवाही करावी.**

३. उपरोक्त अस्थायी पदांवरील खर्च "मागणी क्र. एम-२, २४०८-अन्न साठवण व वखार साठवण, १०१-प्रापण आणि पुरवठा, (०३) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (०३) (०२) मुफसल, दत्तमत योजनेतर (२४०८ ०१०८) ०१ वेतन" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.८ जानेवारी, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११६१२३२२०५००६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Nagappa Chandappa Imade

Digitally signed by Nagappa Chandappa Imade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=F.C.S And C.P. Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8c8889a1f9e9a9ee73d9ef011894f7ad17eb5856e63218598e7f8b9b423349a1, serialNumber=19a4d4d79d3533e917f33e30be7fb33aee65b0315d18be024e91a9b055d1db73, cn=Nagappa Chandappa Imade
Date: 2018.01.16 12:38:31 +05'30'

(ना. चं. इमडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, जळगांव, सोलापूर, बीड, उस्मानाबाद, लातूर, अकोला, बुलढाणा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली
२) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, जळगांव, सोलापूर, बीड, उस्मानाबाद, लातूर, अकोला, बुलढाणा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.
३) सर्व विभागीय आयुक्त,
४) सर्व उपआयुक्त (पुरवठा).
५) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
६) महालेखापाल-१ व २ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
८) वित्त विभाग (व्यय-४ व अर्थसंकल्प-१९),
९) निवड नस्ती (ना.पु. १५).

शासन निर्णय क्र. आस्थाप्र-२४१७/प्र.क्र.४३/नापु-१५

विवरणपत्र "अ"

अ. क्र.	जिल्हयाचे नाव	गोदाम व्यवस्थापक श्रेणी-१ (रु.९३००-३४८००) ग्रे.पे.४३००	गोदाम व्यवस्थापक श्रेणी-२ (रु.५२००-२०२००) ग्रे.पे.२८००	गोदाम व्यवस्थापक (रु.५२००-२०२००) ग्रे.पे.२४००	गोदामपाल (रु.५२०० -२०२००) ग्रे.पे.१९००	गोदाम लिपीक (रु.५२०० -२०२००) ग्रे.पे.१९००	गोदाम पहारेकरी (रु.४४४०-७४४०) ग्रे.पे.१३००	हमाल कम स्वीपर (रु.४४४०-७४४०) ग्रे.पे.१३००	एकूण पदे
१	ठाणे	-	-	-	४	५	४	४	**१७**
२	पालघर	-	-	-	९	४	८	३	**२४**
३	रायगड	१	७	-	१७	११	२९	१४	**७९**
४	रत्नागिरी	४	४	-	७	१२	५	१३	**४५**
५	सिंधुदुर्ग	१	४	-	१२	६	११	९	**४३**
६	अहमदनगर	१	१	-	१२	५	१३	१५	**४७**
७	जळगाव	४	४	-	१९	-	३	१०	**४०**
८	सोलापूर	१	५	-	२४	११	१८	२०	**७९**
९	बीड	-	-	२	१८	२	२२	२०	**६४**
१०	उस्मानाबाद	-	-	-	८	५	९	८	**३०**
११	लातूर	१	२	-	५	५	७	५	**२५**
१२	अकोला	-	-	-	८	४	१३	१४	**३९**
१३	बुलढाणा	-	-	२	१३	४	१४	८	**४१**
१४	नागपूर	-	-	४	१५	६	२०	२१	**६६**
१५	भंडारा	२	२	-	९	५	९	८	**३५**
१६	गोंदिया	१	३	-	१२	६	१२	८	**४२**
१७	चंद्रपूर	१	४	-	२४	९	२३	२१	**८२**
१८	गडचिरोली	१	२	-	१३	८	११	९	**४४**
	एकूण पदे	**१८**	**३८**	**८**	**२२९**	**१०८**	**२३१**	**२१०**	**८४२**